बुधवार, दि २० ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ४८ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

### शिवचैतन्य प्रतिष्ठान आयोजित दहीहंडी महोत्सव २०२५

## चंद्रशेखर आझाद मैदानवर उत्सवाचा शिखर

### जालन्यातील सर्वात मोठ्या दहीहंडी सोहळ्यासाठी नागरिकांमध्ये उत्साह



**जालना । प्रतिनिधी -** श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त यंदा जालन्यातील सर्वात मोठा भव्य दहीहंडी महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. शिवचैतन्य प्रतिष्ठान, जालना यांच्या वतीने बुधवारी दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता चंद्रशेखर आझाद मैदान, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे हा महोत्सव रंगणार आहे.

मागील तीन वर्षांपासून प्रतिष्ठानतर्फे या सोहळ्याचे आयोजन होत असून यंदा या सोहळ्याचे चौथे वर्ष आहे. दहीहंडी सोहळ्याचे उदघाटन माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्रीमती पंकजाताई गोपीनाथराव मुंडे (पालकमंत्री) भूषवणार आहेत, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रतीक भास्करराव पाटील दानवे यांनी दिली.

या कार्यक्रमाला आ.बबनराव लोणीकर, आ.अर्जुनराव खोतकर, आ.नारायण कुचे, आ.संतोष पाटील दानवे, आ.हिकमतराव उढान, माजी आ.राजेश टोपे, माजी आ.कैलास गोरंट्याल, माजी आ.अरविंद चव्हाण, भास्करराव आंबेकर, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी.एम., अतिरिक्त पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, महानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, उद्योजक घनश्यामसेठ गोयल, राजेंद्र राख, राजेश राऊत, अशोक पांगारकर, बद्रीनाथ पठाडे, सतीश जाधव आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

जालना शहरातील नागरिकांनी या भव्य दहीहंडी सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवचैतन्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रतीक भास्करराव पाटील दानवे यांनी केले आहे.

दरम्यान आयोजनासंदर्भाने दहीहंडी महोत्सव स्थळाची पाहणी मंगळवार (दि १९) रोजी करण्यात आली. यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, शिवचैतन्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रतीक दानवे, तसेच रामेश्वर भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, अशोक पांगारकर, सतीश जाधव, बबन शिरसाठ, धनराज काबलीये, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, संजय डोंगरे, महेश निकम, अमोल धानुरे, देविदास देशमुख, सरचिटणीस सुनील पवार यांच्यासह भाजपाचे प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## परतूरमध्ये पुरातन विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचा जीर्णोद्धार



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहराचे आराध्य दैवत असलेल्या बागल गल्लीत पुरातन विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचा बागल परिवाराच्या पुढाकारातून जीर्णोद्धार करण्यात आला असून मंदिरात आता नव्याने विठ्ठल रुक्मिणी मूर्ती ची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे.भाविकांच्या गर्दीत कलशारोहन सोहळा नुकताच पार पडला.

बागल गल्लीत एक पुरातन विठ्ठल-रुक्मिणीचे मंदिर आहे. विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी आजही या मंदिरात भाविकांची गर्दी होत असते हे विशेष. शहराचे आराध्य दैवत असलेल्या या मंदिराची काळाच्या ओघात मात्र दुर्दशा झाली होती. मंदिर मोडकळीस आले होते.मंदिराचे बांधकाम जुने झाल्याने तसेच मोडकळीस आल्याने नव्याने बांधकाम हाती घेण्यात यावे असा विचार बागल परिवारातून पुढे आला. मंदिराचा जीर्णोद्धार झालाच पाहिजे **पान ३ वर**

## छायाचित्रकारांशिवाय जीवन अपूर्ण - भास्करराव अंबेकर

### फोटोग्राफर्स असो. तर्फे छायाचित्र दिन उत्साहात साजरा

**जालना । प्रतिनिधी -** जन्माच्या पूर्वीपासून मृत्यूनंतरही आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर असलेल्या स्मृती छायाचित्रकारांमुळेच जतन होतात .मोबाईल पेक्षा कॅमेऱ्यातून टिपलेले सौंदर्य चिरकाल टिकणारे असून छायाचित्रकारांशिवाय मानवी जीवन अपूर्ण आहे. असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना उ. बा.ठा.चे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केले.

जालना जिल्हा फोटोग्राफर्स असोसिएशनच्या वतीने मंगळवारी ( ता.१९) जे .ई.एस. महाविद्यालयाच्या सभागृहात जागतिक छायाचित्र दिन जल्लोषात साजरा करण्यात आला. सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी अंबेकर बोलत होते. यावेळी सिनेअभिनेत्री वैशाली दाभाडे, जागतिक कीर्तीचे छायाचित्रकार किशोर निकम,कृष्णा खोतकर, अग्रविभूषण सुभाषचंद्र देविदान, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, विष्णू पाचफुले, मुन्ना बगडिया, शैलेश घुमारे,जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा सीमा काकडे-गंगाधरे, महोत्सव समितीचे अध्यक्ष विष्णू



जाधव, उपाध्यक्ष निलेश सोलाट,सचिव लेलैश वरगंटे, कोषाध्यक्ष अभिषेक डुकरे,फोटोग्राफर्स असो.चे अध्यक्ष अनिल व्यवहारे , उपाध्यक्ष सोनाजी नन्नवरे पाटील,सचिव मधुसूदन दंडारे, सहसचिव शाम गिराम ,कोषाध्यक्ष मोहन मिटकरी, सह कोषाध्यक्ष गौतम वाघमारे, संघटक प्रशांत जिगे, **पान ३ वर**

### मला अधिकृत करा - गोरंट्याल

आर्ट गॅलरी साठी जागा मिळून द्यावी, अशी मागणी अनिल व्यवहारे यांनी केली होती. तोच धागा पकडत माजी आ. कैलास गोरंट्याल यांनी फोटोग्राफर्स असोसिएशन अधिकृत झाली आहे ,जागा उपलब्ध करून देण्यासाठी मला अधिकृत करा अशी मिश्कील टिप्पणी केली. तसेच आपण छायाचित्रकार बांधवांसोबत असल्याचे सांगून शुभेच्छा दिल्या. यावेळी अक्षय गोरंट्याल, माजी नगरसेवक अशोक पवार, विजय पवार, शिवप्रकाश चितळकर आदींची उपस्थिती होती.

# संपादकीय

## न्यूज चॅनल; परवानग्या, नियम आणि विश्वासार्हतेचा प्रश्न

भारतासारख्या लोकशाही राष्ट्रात माध्यमांची भूमिका अत्यंत म हत्वाची आहे. लोकशाहीचे चौथे स्तंभ म्हणून माध्यमांना विशेष जबाबदारी असते. मात्र या जबाबदारीइतकीच महत्वाची गोष्ट म्हणजे कायदेशीर चौकटीत राहून कार्य करणे. अलीकडच्या काळात पारंपरिक टीव्ही न्यूज चॅनलसोबतच डिजिटल न्यूज पोर्टल्स आणि यूट्यूब चॅनल्सची संख्या झपाट्याने वाढली आहे. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो - न्यूज चॅनल सुरू करण्यासाठी कोणत्या परवानग्या आवश्यक आहेत आणि त्या न घेतल्यास काय परिणाम होऊ शकतात?

टीव्ही न्यूज चॅनल हे मोठ्या पायाभूत सुविधांवर चालते. त्यामुळे माहिती आणि प्रसारण मंत्रालयाची (MIB) अपलिंकिंग-डाउनलिंकिंग परवानगी ही अत्यावश्यक ठरते. त्याचबरोबर TRI चे नियम, कंपनी नोंदणी व आर्थिक पारदर्शकता या अटी पूर्ण करणे बंधनकारक असते. या प्रक्रियेतील कडक छाननीमुळे फेक न्यूज, काळा पैसा किंवा परदेशी नियंत्रण यासारख्या धोक्यांना आळा बसतो. यूट्यूब, वेबसाईट्स, सोशल मीडिया अशा डिजिटल प्लॅटफॉर्मवर आज हजारो न्यूज चॅनल्स कार्यरत आहेत. इथे प्रवेश सोपा असला तरी आता सोशल मिडीया नियम; मध्यस्थ मार्गदर्शक तत्वे आणि डिजिटल मीडिया आचारसंहिता नियम, २०२१ अंतर्गत त्यांची नोंदणी बंधनकारक झाली आहे. यामुळे डिजिटल माध्यमांना अधिकृत ओळख मिळते आणि जबाबदारीही निश्चित होते. परवानगीशिवाय न्यूज चॅनल चालवणे हा केवळ कायद्याचा भंग नसून लोकशाहीसाठी गंभीर धोका आहे., अशा चॅनलवर दंड आणि प्रसारण बंदी घालू शकते., संचालकांवर गुन्हे दाखल होऊन तुरुंगवासाची शक्यता निर्माण होते., सर्वात महत्वाचे म्हणजे अशा चॅनलची विश्वासार्हता आणि प्रतिष्ठा संपते. आजच्या डिजिटल युगात लोकांना माहिती सहज उपलब्ध असली तरी विश्वासार्ह माहिती मिळणे ही खरी गरज आहे. आणि विश्वासार्हता ही केवळ कायदेशीर चौकट पाळूनच टिकू शकते.न्यूज चॅनल सुरू करणे हे फक्त व्यवसायिक संधी किंवा लोकप्रियतेचे साधन नसून लोकशाहीला बळकट करणारी जबाबदारी आहे. म्हणूनच कोणतेही न्यूज चॅनेल, मग ते टीव्ही असो किंवा डिजिटल, सरकारच्या नियमांचे पालन करूनच सुरू केले पाहिजे. यामुळे केवळ कायदेशीर अडचणी टाळल्या जात नाहीत तर समाजात चॅनलची विश्वासार्हता आणि नैतिकता टिकून राहते. पत्रकारिता म्हणजे सत्याचे आरसे घडवणे; ते आरसे स्वच्छ ठेवण्यासाठी परवानग्या व नियमांचे पालन अनिवार्य आहे.

भारतामध्ये न्यूज चॅनल सुरू करण्यासाठी MIB, TRI अंतर्गत तर युट्यूबसाठी सोशल मिडीया आचारसंहिता २०२१ नुसार परवानग्या घ्याव्या लागतात. यामुळे नियंत्रण, पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित होते. परंतु इतर देशांमध्येही हेच तत्त्व विविध प्रकारे लागू होताना दिसते: अमेरिकेत टीव्ही व रेडिओ प्रसारणासाठी Federal Communications Commission (FCC) ची परवानगी घ्यावी लागते. मात्र डिजिटल न्यूज पोर्टल्सवर थेट सरकारी परवानगी नसते, तरीही ते मीडिया लॉ व कॉपीराइट कायदे यांच्या चौकटीत काम करतात. युनायटेड किंगडम (युएस) येथे प्रसारण चॅनलसाठी Ofcom हे स्वतंत्र नियामक प्राधिकरण परवानगी देते. फेक न्यूज, आक्षेपार्ह मजकूर किंवा द्वेषपूर्ण भाषणावर कठोर कारवाई केली जाते. चीनमध्ये प्रसारमाध्यमे पूर्णपणे सरकारी नियंत्रणाखाली आहेत. कोणतेही न्यूज चॅनल किंवा पोर्टल सरकारच्या परवानगीशिवाय कार्य करू शकत नाही. सेंसरशिप अत्यंत कडक आहे. जपानमध्ये मीडिया स्वायत्त आहे, पण प्रसारणासाठी सरकारची परवानगी आवश्यक असते. डिजिटल पोर्टल्ससाठी मात्र पत्रकारितेच्या व्यावसायिक नियमांचे पालन महत्त्वाचे मानले जाते. भारतातील परवानग्या अमेरिका व युएस सारख्या लोकशाही राष्ट्रांप्रमाणेच कायदेशीर नियंत्रण स्वातंत्र्याचा समतोल साधतात. तर चीनसारख्या देशात जिथे पूर्ण सरकारी नियंत्रण आहे, तिथे माध्यमस्वातंत्र्य कमी आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मवर जगभरात थेट परवानगी नसली तरी नोंदणी, कायदेशीर जबाबदारी आणि नैतिक नियमांचे पालन सर्वत्र महत्त्वाचे आहे.

जालना जिल्ह्यात केवळ नेटवर्कवरून न्यूज चॅनल हे परवानगीविना सुरु असून युट्यूब चॅनलचा तर सुळसुळाट झाला आहे. अशांवर आता कारवाईचा बडगा उचलणे गरजेचे झाले आहे. पत्रकारितेतील नैतिक नियमांचे तर पालन करतच नाहीत. नोंदणी आणि कायदेशीर जबाबदारीची त्यांना जाणीव नाही.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष

# गरजूंना दिलासा देणारी योजना

आर्थिक दृष्ट्या गरजू रुग्णांना तातडीच्या व अत्यावश्यक आजारांवर उपचार मिळणेकरीता मा. देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष जिल्हास्तरावर सुरु करण्यात आलेला आहे. समाजातील गरीब व गरजू रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे, धर्मादाय रुग्णालयांतर्गत मोफत उपचार मिळवून देणे, महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत योजनेसह इतर योजनांची माहिती व सुविधा रुग्णांना मिळवून देणे, तसेच योजनेच्या बाहेर असलेल्या रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत मदत पुरविणे हे या कक्षाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सदर कक्षाद्वारे जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारांवर उपचार करण्यासाठी या निधीतून अर्थसहाय्य पुरविले जाते.

पूर, दुष्काळ, आगीमुळे होणारे अपघात, म ोठ्या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधीत नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी मार्फत अर्थसहाय्य पुरविले जाते. मुख्यमंत्री कार्यालयामार्फत अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरिता रुग्णांना आर्थिक सहाय्य देण्यात येते. राज्यातील गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे, हाच या कक्षाचा प्रमुख उद्देश आहे. मुख्यमंत्री सचिवालयाच्या दि. १३ ऑगस्ट २०१५ च्या परिपत्रक क्र. मुमंसनि-२०१५/प्र.क्र.१/निधी कक्ष नुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष कार्यरत आहे. या कक्षाच्या माध्यमातून हजारो रुग्णांना उपचार मिळाले आहेत.

जालना जिल्ह्यासाठी नवीन जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या इमारतीम ध्ये १ मे, २०२५ रोजी या कक्षाचे उद्घाटन करण्यात आले आहे. हा कक्ष जिल्ह्यातील अनेक गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना खऱ्या अर्थाने 'जीवनदायी' ठरत आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीच्या योग्य आणि पारदर्शक वितरणासाठी राज्य आणि जिल्हास्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. निधीचा वापर योग्य गरजूंपर्यंत पोहोचतो की नाही याची खात्री या समि तीमार्फत केली जाते. राज्यस्तरीय समिती ही मुख्यमंत्री सहायता निधीच्या व्यवस्थापनाची आणि धोरणात्मक निर्णयांची शिखर संस्था आहे. मुख्यमंत्री कार्यालयाच्या अखत्यारित हा कक्ष कार्य करतो.

**या योजनेसाठी पात्रता निकष कोणते आहेत?**

निदान व उपचारासाठी लागणा-या वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रक (रुग्ण खाजगी रुग्णालय दाखल असल्यास सदरहू अंदाजपत्रक मा. जिल्हा शल्यचिकीत्सक यांचेद्वारा प्रमाणित करुन घेतलेले असावे)

तहसिलदार कार्यालयाद्वारे प्रमाणित चालू आर्थिक वर्षाचा उत्पन्नाचा दाखला. (रु १.६० लाख प्रती वर्षपेक्षा कमी असणे आवश्यक आहे)

रुग्णाचे आधार कार्ड / लहान बालकांच्या बाबतीत बालकाच्या मातेचे आधारकार्ड

रुग्णाचे रेशनकार्ड

संबंधीत व्याधी विकार / आजाराचे संबंधी निदानात्मक तथा उपचारात्मक बाबींची कागदपत्रे

अपघात झाला असल्यास FIR रिपोर्ट किंव्हा पोलिस डायरीची प्रत जोडावी ( MLC रिपोर्ट ग्राह्य धरण्यात येणार नाही )

या योजने अंतर्गत पुढील आजारांवर मदत मिळते. यामध्ये कॉकलियर इम्प्लांट / अंतस्त कर्ण रोपण शस्त्रक्रिया (Cochlearimplant) वय वर्षे २ ते ६, हृदय प्रत्यारोपण (Heart Transplant), यकृत प्रत्यारोपण (Liver Transplant), मूत्रपिंड प्रत्यारोपण (Kidney Transplant), फुफ्फुस प्रत्यारोपण (Lung Transplant), अस्थीमज्जा प्रत्यारोपण (Bone Marrow Transplant), हाताचे प्रत्यारोपण (Hand re reconstruction surgery), खुब्याचे प्रत्यारोपण (Hip replacement) कर्करोग शस्त्रक्रिया (CanCer Surgery), कर्करोग औषधोपचार किरणोपचार (Cancer Chemotherapy and Radiotherapy), अस्थिबंधन (Surgery for ligament injug), नवजात शिशुचे संबंधित आजार (Diseases of new born babies), गुडघ्याचे प्रत्यारोपण (Knee Replacement), रस्ते अपघात




(Road traffic accidents), लहान बालकांच्या संबंधीत शस्त्रक्रिया (Paediatric Surgeries), मेंदुचे आजार (Diseases of nervous system), हृदयरोग (Cardiac Diseases), डायलिसिस (Dyalysisi), जळीत रुग्ण (Burn injuries), विद्युत अपघात / विद्युत जळीत रुग्ण (Electric Burn injuries)

अर्ज करताना पुढील कागदपत्रे आवश्यक आहेत. अर्ज (विहित नमुन्यात), शिफारसपत्र, रुग्णाचे आधारकार्ड (लहान बाळासाठी आईचे आधारकार्ड), रुग्णाचे रेशनकार्ड, तहसिलदार कार्यालयाचा चालू वर्षाचा उत्पन्नाचा दाखला (रु.१.६० लाखापेक्षा कमी असणे आवश्यक), निदान व उपचारासाठी लागणाऱ्या वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्रामध्ये Hospital Registered Bank Detail नमूद करावे. (खाजगी रुग्णालय असल्यास सिव्हील सर्जन यांचेकडून प्रमाणित केलेले.), रुग्णाचा geo tage photo (त्याकरिता gps map camera हे app download करावे), अपघात झाला असल्यास FIR रिपोर्ट किंव्हा पोलिस डायरीची प्रत जोडावी ( MLC रिपोर्ट ग्राह्य धरण्यात येणार नाही), अर्जामध्ये नमूद केलेल्या आजाराबद्दलची सर्व कागदपत्रे (Digital एक्सरे, CT स्कॅन, MRI रिपोर्ट्स, ब्लड रिपोर्ट्स, इत्यादी), अपघातग्रस्त व जळालेल्या रुग्णांचा सदयस्थिती दाखवणारा फोटो, अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया अपेक्षित असलेल्या रुग्णांसाठी विभागीय आवश्यक प्रत्यारोपण समन्वय समिती प्रमाणपत्र (ZTCC) वरील सर्व कागदपत्रे दिलेल्या क्रमाने स्कॅन करुन सर्व कागदपत्रांची एकत्रित झअ्रू फाईल करुन जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या ईमेलवर मेल करण्यात यावा.

**अर्ज करण्याची पध्दत कशी आहे.**

विहीत नमुन्यात अर्ज भरुन, आवश्यक ते सर्व कागदपत्रे सोबत आणल्यास मुख्यमंत्री सहाय्यता कक्षामधून सदरील अर्ज ई-मेलद्वारे पाठविण्यात येतो. त्यानंतर सदरील अर्जात नमूद माहितीच्या आधारे रुग्णांचे सहाय्यता निधी मंजूर करण्यात येतो.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी रुग्णालयाची कोणती अट असते. (सरकारी / धर्मादाय / म ान्यताप्राप्त खाजगी रुग्णालय असणे आवश्यक आहे.)

रुग्णांवर करण्यात येणारे उपचार हे सीएम आरएफ अंतर्गत मान्यताप्राप्त असावे व रुग्णाचा आजार हा वरील आजार यादीत नमूद असावा. डिस्चार्ज झालेल्या/उपचार पूर्ण झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती म्हणून अर्थसहाय्य दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी. संशयास्पद अथवा खोटी/बनावट माहिती दिलेली आढळल्यास तो अर्ज रद्द करण्यात येईल तसेच कायदेशीर कार्यवाहीस पात्र ठरेल.

एकूण किती रक्कम मिळू शकते. रुग्णालयाने दिलेल्या कोटेशनच्या आधारे उपचारास आवश्यक असेल तेवढाच निधी देण्यात येतो. सदरचा निधी रुग्णालयाच्या नोंदणीकृत खात्यावरच वर्ग करण्यांत येतो.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीला एफसीआरए मान्यता मिळाल्याचा अर्थ काय? आणि त्याचा लाभ काय आहे?

मुख्यमंत्री सहाय्यता निधीला एफसीआरए मान्यता मिळाली - मुख्यमंत्री सहाय्यता निधी संकलनासाठी परदेशातून विविध व्यक्ती व संस्था यांच्या वतीने आर्थिक मदत स्वीकारणेसाठी भारत सरकारच्या आर्थिक निकषाच्या सर्व बाबी पडताळून व आवश्यक त्या शासकीय परवानगी मिळणेबाबतचा सर्व विषय एफसीआरएमार्फत होत असतो. तरी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एफसीआरए सर्व निकष परिपूर्ण होवून विदेशातून व्यक्ती व संस्थानमार्फत सदर कक्षास आर्थिक देणगी मिळण्याची परवानगी मिळालेली आहे. व संपूर्ण देशात याबाबत म हाराष्ट्र हे प्रथम व एकमेव राज्य आहे.

एफसीआरएला मान्यता मिळाल्यामुळे महाराष्ट्रातील जास्तीत जास्त गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी कक्षाच्या वतीने आर्थिक मदत देणे सुलभ होणार आहे. नागरिकांची सोय लक्षात घेऊन, अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष सुरू करण्यात आले आहेत. यामुळे अर्जदारांना मंत्रालयात जाण्याची गरज राहिलेली नाही. त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचतो. जिल्हास्तरीय समिती ही स्थानिक पातळीवरच्या गरजा आणि अर्जदारांना तात्काळ मदत देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

**-संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय, जालना**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# न्यायालयीन प्रलंबीत प्रकरणात सर्वाधिक प्रकरणे कौटुंबिक - ॲड. अनिता बाफना

## रोटरी मिडटाऊनतर्फे न्यायालयीन प्रकरण व्यवस्थापन व भारतीय न्यायव्यवस्था यावर कार्यशाळा

**जालना । प्रतिनिधी -** भारतात न्यायालयीन प्रलंबीत प्रकरणांमध्ये सर्वाधिक प्रकरणे ही कौटुंबिक वादासंदर्भातील असल्याचे वास्तव धक्कादायक आहे. पती-पत्नीतील वाद, वारसाहक्काच्या प्रश्नांवरून होणारे मतभेद, मुलांच्या संगोपनावरील वाद या कारणामुळे न्यायालयीन प्रकरणांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाच्या अधिवक्त्या ड. अनिता बाफना यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाउनतर्फे सोमवार दि. १८ ऑगस्ट रोजी हॉटेल सेफ्रॉन येथे न्यायालयीन प्रकरण व्यवस्थापन व भारतीय न्यायव्यवस्था या विषयावर आयोजित कार्यशाळेत त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, वारसाहक्काशी निगडित वाद टाळण्यासाठी इच्छापत्राचे स्पष्ट लिखाण असणे अत्यावश्यक आहे. अनेकदा आई-वडील हे मुलांमध्ये अन्याय्य विभागणी करून देतात किंवा इच्छापत्र न करता मृत्यू झाल्यास मुलांमध्ये कटुता वाढते आणि त्यातून वाद निर्माण होतो. त्यामुळे इच्छापत्र शक्यतो सर्वांना समान हक्क देणारे असावे. पती-पत्नीमधील वादांमुळे मुलांच्या शिक्षणावर, आयुष्यावर गंभीर परिणाम होतात. त्यामुळे किरकोळ कारणावरून भांडण वाढवू नये, तर एकमेकांच्या जबाबदाऱ्या स्वीकारून मुलांच्या हिताचा विचार करून निर्णय घ्यावेत. पती-पत्नीने एकत्र राहिले नाही तरी मुलांचे पालनपोषण व शिक्षणाची जबाबदारी टाळता येत नाही. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आता न्याय मिळवण्याची प्रक्रिया सुलभ झाली असल्याचेही ड. बाफना यांनी स्पष्ट केले. मोबाईलच्या माध्यमातून आज प्रत्येकाला न्यायालयीन प्रकरणाची माहिती सहज उपलब्ध होते. ऑनलाईन दाखल केलेली कागदपत्रे न्यायालयात ग्राह्य धरली जातात. मात्र, नवीन पुरावे व कागदपत्रे लेखी स्वरूपात वेळेत सादर न केल्यास संबंधित पक्षकारांना तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे स्वतःच्या बाजूला बळकटी देण्यासाठी वकिलांमार्फत पुरावे आणि माहिती वेळेत सादर करणे आवश्यक आहे. यावेळी त्यांनी जालना येथील लिटीगन्टस् असोसिएशनचे कौतुक केले व न्यायालय संख्या व इन्फ्रास्ट्रक्चर वाढविण्यासाठी पाठपुरावा करावा, असा सल्ला दिला. कार्यशाळेचा उद्देश विशद करताना क्लबचे अध्यक्ष अंकित अग्रवाल म्हणाले की, आमचा क्लब नेहमीच समाजोपयोगी व दैनंदिन विषयावर जनतेला मार्गदर्शन करणारे उपक्रम राबवतो. न्यायालयीन प्रकरणांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाल्याने उपस्थितांना रोजच्या व्यवहारात नक्कीच उपयोग होणार आहे. या चर्चेतून मिळालेली शिकवण पुढील आयुष्यात मार्गदर्शक ठरेल.




या कार्यशाळेला लिटीगन्टस् असोसिएशनचे सचिव नरेंद्र मोदी, रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनचे अध्यक्ष अंकित अग्रवाल, प्रकल्प प्रमुख ड. महेश धन्नावत, माजी अध्यक्ष प्रतिक नानावटी, प्रशांत बागडी, आशिष बजाज, जगदीश अग्रवाल, मनोज गिल्डा, अमित बगडीया, डॉ. सोनी, श्री. शरद गादिया, डॉ. कैलास सचदेव, महेश भक्कड, ड. शरद जैस्वाल, अर्जुन पित्ती, डॉ. शिवदत्त विजयसेनानी यांच्यासह जालना पीपल्स बँक, मोतीराम अग्रवाल मर्चंट बँक, ओमप्रकाश देवडा हिंगोली पीपल्स बँकेचे संचालक, अधिकारी, कर्मचाऱ्यांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रकल्प ड. महेश धन्नावत यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रास्ताविक अंकित अग्रवाल यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. सुजाता नानावटी यांनी मानले.

पान १ वरुन

## छायाचित्रकारांशिवाय ...

ज्येष्ठ छायाचित्रकार राजेश खर्डेकर, यांची प्रमुख उपस्थिती होती.

किशोर निकम यांनी ग्राहक स्टुडिओ पर्यंत आला पाहिजे यासाठी सोशल मीडियावर न रमता छायाचित्रकारांनी आत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून व्यवसायाची मार्केटिंग करावी,असे आवाहन केले.

विष्णू पाचफुले यावेळी म्हणाले, आमच्या समाजसेवा कार्यात छायाचित्रकारांचा सिंहाचा वाटा असून आर्ट गॅलरी साठी जागा मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहू अशी ग्वाही दिली.

अभिनेत्री वैशाली दाभाडे यांनी छायाचित्रकारांमुळेच सिनेसृष्टीतील प्रवासात वाटचाल करता आली असे स्पष्ट केले.

प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी अमेरिकेतील विद्यापीठांसोबत समन्वय असलेल्या मोठ्या कंपनीसोबत करार करण्याचे प्रयत्न सुरू असून लवकरच महाविद्यालयात द ग्रेट कोर्सेस छायाचित्रकारांसाठी स्वतंत्र पणे सुरू होईल असे सांगितले.

सुभाषचंद्र देविदान, शैलेश घुमारे, सीमा काकडे यांनी छायाचित्रकारांचे अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे सांगून फोटोग्राफर्स असोसिएशन नोंदणीकृत झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविकात अनिल व्यवहारे यांनी दहा वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर अखेर जालना जिल्हा फोटोग्राफर्स असोसिएशन नोंदणी कृत झाली असून आता सुसज्ज आर्ट गॅलरी उभारणी साठी अधिक जोमाने प्रयत्न करणार असल्याचे अनिल व्यवहारे यांनी स्पष्ट केले.

सुत्रसंचालन आशीष रसाळ यांनी केले तर विष्णू जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रम स्थळी वन्यजीव छायाचित्रकार ज्ञानेश्वर गिराम त्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले यावेळी छायाचित्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## परतूरमध्ये पुरातन ...

यावर सर्वांचेच एकमत झाले. चांगल्या कार्याला उशीर नको म्हणून ताबडतोब मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम हाती घेण्यात आले. सर्वांनी विनाविलंब शक्य असेल ती मदत सर्वोतोपरी केली. अवघ्या तीन-चार महिन्यात मंदीराचे काम पूर्ण करण्यात आले.

खास राजस्थानमधील किशनगड येथून श्रीराम, लक्ष्मण, सीता, गणपती, श्री लकडेश्वर महादेव तसेच हनुमानाची मूर्ती आणण्यात आली.मंदिराची रंग-रंगोटी करण्यात आली आहे. त्यामुळे मंदिराला आता पूर्वीचे वैभव प्राप्त झाले. मंदिराचा जीर्णोद्धार झाल्याने संपूर्ण परतूर पंचक्रोशीतील विठ्ठल भक्तांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

मंदिर जिर्णोद्धार विधी महामहिम राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त डॉ. प्रतीक जोशी, सूरेश जोशी, बंडूनाना पुराणिक यांच्यासह इतर पुरोहितांच्या उपस्थितीत पार पडला. कै.शेषराव भुजंगराव बागल पाटील यांनी वैयक्तिक स्थापन केलेले हे पुरातन विठ्ठल-रुक्मिणी मंदिर शहराचे आराध्य दैवत आहे.मंदिर जुने झाल्याने मोडकळीस आले होते. त्यामुळे बागल परिवाराच्या वतीने मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. मंदिराला पूर्वीचे वैभव प्राप्त झाल्याने भाविकांमध्ये समाधान व्यक्त होत असल्याचे ॲड विशाल बागल यांनी सांगितले आहे.

# व्यवसाय मार्गदर्शनासाठी मोफत कॉल सेंटर

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्रात उद्योग उभारणीसाठी लागणारे सहाय्य करण्यासाठी तसेच जिल्ह्यातील उद्योजक संघटना, नवउद्योजकांना व्यवसायाशी निगडीत मार्गदर्शनासह शासनाकडून मिळणाऱ्या विविध सवलती जाणून घेण्यासाठी कॉल सेंटर सुरु करण्यात आले आहे. तरी आपल्या शंकांचे निरसन करण्यासाठी १८००२३३२०३३, ०२२२२६२२३२२, ०२२२२६२२३६१ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.









# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात पोळा, गणेशमुर्ती स्थापना या सण, उत्सव आणि इतर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.२८ ऑगस्ट २०२५ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत.

संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी-कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## २६ ऑगस्ट रोजी काढणी पश्चात पायाभूत सुविधा व गोदाम घटकासाठी प्राप्त अर्जाची सोडत

**जालना -** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबिया सन २०२५-२६अंतर्गत जालना जिल्ह्यासाठी फ्लेक्सी घटकांतर्गत गोदाम बांधणीसाठी भौतिक १ त्यासाठी ५० टक्के किंवा १२.५० लाख अनुदान तसेच काढणी पश्चात पायाभूत सुविधा या घटकासाठी भौतिक १ त्यासाठी खर्चाच्या ३३ टक्के किंवा ९.९० लाख यापमाणे लक्षांक प्राप्त आहे. या घटकासाठी इच्छुक शेतकरी उत्पादक कंपन्यांनी तालुका कृषि अधिकारी कार्यालयात विहीत वेळेत दि. ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे कृषि विभागाने कळविले होते. त्यानुषंगाने काढणी पश्चात पायाभुत सुविधा व गोदाम या घटकासाठी जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपनींचे अर्ज संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास दाखल केले आहेत. या बाबीसाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या दालनात मंगळवार दि. २६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता मार्गदर्शक सुचनेच्या अधिन राहून संबंधित अधिकारी व कर्मचारी तसेच शेतकरी उत्पादक कंपनीचे प्रतिनिधी यांच्या समक्ष सोडत पध्दतीने लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे, तरी अधिकारी व कर्मचारी तसेच शेतकरी उत्पादक कंपनीच्या प्रतिनिधींनी वेळेत उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी जी.आर.कापसे यांनी केले आहे.

युवा आदर्श

### वास्तव ...

ज्यांच्या मधून कधी
जात नव्हता विस्तव
त्यांच्या सोबत दोस्ती
गंभीर स्थिती वास्तव
नीत करे दगा फटका
गाठीशी जुना अनुभव
कशी झाली किमया
एकत्र बसे महानुभाव
गठबंधन बांधले तरी
वाटले जरी अ संभव
खुणावते सुवर्ण संधी
मोहमयी सत्ता वैभव
लढून पाहिले विभक्त
झाला दारूण पराभव
फसले विभिन्न प्रयोग
जनमानसाचा परिभव
फसले एकला चलो रे
निरूपयोगी अविर्भाव
नव लाट येई अचानक
मतैक्यावर करे प्रभाव
जिद्द हवीय जिंकायची
यंदा तरी बाबा सप्रभव
दोष द्यायचा दुसऱ्यांस
ये जरीपदरी अभिभव

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

